महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

क्रमांक : अंदाज -२०१३/प्र.क्र.११/अर्थसंकल्प-३,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ०१ फेब्रुवारी, २०१३.

निविदा सूचना

अर्थसंकल्प शाखा, वित्त विभाग, मंत्रालय हे खालील वस्तुंचा पुरवठा करण्यासाठी मोहोरबंद निविदा मागवित आहेत :-

बाहेरच्या भागावर ३ पॉकेट असणारी, वाढविता येऊ शकणारी (एक्स्पांडेबल फिचर), सुमारे ६५से.मी. आकाराची, मजबूत हँडल असणारी, मजबूत चांगल्या प्रतीची चेन (रनर) असलेली, बॅगेच्या वरील भागास आतल्या बाजूला पूर्णपणे उघडता येणारा कप्पा असलेली, अपराईट स्पीनर ४ चाकी पॉलिएस्टर (डेनियर सुमारे ९००-१२००) लगेज बॅग (कुलुपासह). एकाच वेळी सुमारे ५०० ते ७५० नग.

वरील प्रमाणे पुरवठा करण्यासाठी योग्य अनुभवी मान्यवर उत्पादक, वितरक किंवा पुरवठादार यांचेकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

विहित नमुन्याच्या निविदा व नियमांच्या प्रती दि. ०४ फेब्रुवारी, २०१३ ते दि. ०८ फेब्रुवारी, २०१३ पर्यंत दुपारी २.०० ते ५.०० वाजेपर्यंत अवर सचिव (अर्थसंकल्प), वित्त विभाग, दालन क्र. ३०७ (मुख्य), मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२ येथे विहित मुल्यास विकत मिळतील. भरलेल्या निविदा दि. ११ फेब्रुवारी, २०१३ ते दि. १३ फेब्रुवारी, २०१३ पर्यंत दुपारी २.०० ते ५.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील.

प्राप्त झालेल्या निविदा दि. १५ फेब्रुवारी, २०१३ रोजी दुपारी ३.३० वाजता उपस्थित निविदाकरांच्या समोर प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग यांचे दालन क्र. ३१८ (मुख्य), मंत्रालय, मुंबई येथे उघडण्यात येतील.

अर्थसंकल्प शाखा, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.

टिप :- निविदेमधील कोणतीही बाब किंवा संपूर्ण निविदा काहीही कारण न देता नाकारण्याचा अथवा निविदेतील नमूद केलेली एखादी किंवा सर्व बाबी स्वीकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे.